# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 218 /2020 दिनांक: 15 / 04/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020

3. साथरोग अधिनियम,1897

4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020

5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 160 /2020 दिनांक 31.03.2020

6. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020.

7. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 1520/प्र.क्र.25/ना.पु.-23 दिनांक 2 एप्रिल 2020

8. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र . No. DMU/2020/CR.92/DisM-1, Datged 13th April 2020

09. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020

10. फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973,

11. मुंबई पोलीस अधिनियम 1951

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार *दिनांक* 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-१९) उद्‌भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020 चे आदेशाद्वारे संचारबंदी बाबत अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, मी **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार व प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने विविध आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदीनुसार संचारबंदी बाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 मधील कलम 3 अन्वये — Penalty Any person disobeying any regulation or ordere made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code ( 45 of 1860 ) अशी तरतुद नमूद केली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973, मुंबई पोलीस अधिनियम 1951 तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेले आदेशांचा भंग , काही व्यक्ती करित असल्याचे माझे निदर्शनास आले आहे.

***साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 मधील कलम 3 अन्वये — Penalty Any person disobeying any regulation or ordere made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code ( 45 of 1860 )*** अशी तरतुद नमूद केली आहे.

NitinN 229

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 ची अधिसूचना व फौजदारी प्रक्रिया संहिता -1973 चे कलम 144 व मुंबई पोलीस अधिनियम -1951 , कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे अनुषंगाने निर्गमित केलेले आदेश ज्या दिनांकास असे आदेश पारीत केलेले आहेत, अशा आदेशांचा भंग करणा-या व्यक्ती विरुध्द भारतीय दंड सहिता – 1860 चे कलम 188 नुसार पारीत केलेल्या आदेशाचे दिनांकापासून गुन्हे दाखल करणेकामी अकोला जिल्हातील संबंधीत पोलीस अधिकारी /कर्मचारी यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | गुन्हयाचे स्वरुप | करावयाची कारवाई | तपासणी करणारे विभाग |
|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक स्थळी ( रस्ते , बाजार, रुग्णालये, बस स्थानक, रेल्वे स्टेशन,शासकीय कार्यालय इ) ठिकाणी थुंकणे. | **रु. 300/- दंड** | स्थानिक स्वराज्य संस्था<br>( महानगरपालिका/नगर परिषद/ नगर पंचायत/ ग्राम पंचायत.<br>संबंधीत शासकीय विभाग/कार्यालये |
| 2 | सार्वजनिक स्थळी चेह-यावर मास्क न लावणे | **रु. 200/- दंड** | स्थानिक स्वराज्य संस्था<br>( महानगरपालिका/नगर परिषद/ नगर पंचायत/ ग्राम पंचायत.<br>संबंधीत शासकीय विभाग/कार्यालये |
| 3 | दुकानदार/ फळभाजीपाला विक्रते /सर्व जिवनावश्यक वस्तु विक्रेते/ इ. आणि ग्राहक यांनी सोशल डिस्टंसिंग न राखने,विक्रत्याने मार्कींग न करणे इ. | **रु.** 200/- (ग्राहक/व्यक्ती)<br>**रु.** 2000/- दंड<br>(आस्थापना , मालक, दुकानदार , विक्रेता) | स्थानिक स्वराज्य संस्था<br>( महानगरपालिका/नगर परिषद/ नगर पंचायत/ ग्राम पंचायत. |

सदर आदेश हा सर्व संबंधीत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणणेत यावा.

सदर आदेश आज **दिनांक** 15 **एप्रिल** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी-**

१. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
२. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
३. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
४. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
५. सहा. आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता. . त्यांनी सदर आदेशाचे तंतोतत पालन होण्याचे दृष्टीने आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना परस्पर कळविण्याकरिता.
६. उपविभागीय अधिकारी ----------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
७. तहसिलदार ------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
८. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी जास्त खपाच्या वृत्तपत्रामधून विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला